(213)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोपुआ/ १०५/२०२१
दिनांक : 11 /06/२०२१.

(149)

# "झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश"

## (महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना )

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. १९/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव मौजे भोसरी सि.स.नं. २९९१, २९९२, येथील गणेशनगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर (पूर्णत:) अंदाजे क्षेत्रफळ ३९९०.३७ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

ज्याअर्थी, तत्कालीन सक्षम प्राधिकारी व सहाय्यक आयुक्त (झोनिपु), पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी, पुणे यांनी सदरचे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ११ एप्रिल १९९१ पृष्ठ क्र.८५७ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार पुर्णत: झोपडपट्टी क्षेत्र घोषित केले आहे; आणि

ज्याअर्थी, खालील अनुसूचीमधील क्षेत्र शासकीय मालकीचे असून अभिलेखानुसार ते महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ या नावाने नोंदविले आहे; आणि

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र **'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'** म्हणून घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ८-१४ एप्रिल २०२१ पृष्ठ क्र. ९ तसेच दैनिक राष्ट्रतेज या वृत्तपत्रात दि.२४/०४/२०२१ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि. २४/०४/२०२१ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, सदरच्या प्राथमिक पुर्वसूचनेद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले शासकिय विभाग यांना सदर क्षेत्राबाबत कळविणेत आले होते. परंतु याबाबत कोणतेही अपेक्ष / हरकत विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेले नाहीत.; आणि

१३७

ज्याअर्थी, उपरोक्त झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती अहवालांच्या अवलोकनांती, खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्राच्या बाबतीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, म्हणून खात्री पटली आहे; आणि

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे **'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'** म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ येथे अपील दाखल करता येईल आणि तक्रार निवारण समितीचा अशा अपिलावरील निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

**महानगरपालिका क्षेत्र - पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

**झोपडपट्टीचे नाव - सि.स.नं.२९९१, २९९२, गणेशनगर , भोसरी एम.आय.डी.सी., पिंपरी चिंचवड, पुणे.**

| गाव | स.नं. (सि.स.) | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) अंशत: / पूर्णत: | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| गणेशनगर, भोसरी | २९९१, २९९२ | एम.आय.डी.सी | ३९९०.३७ चौ. मी. | **पुर्वेस** - टेल्को रोड.<br>**पश्चिमेस -** सि.स.नं.२९४८, २९४९, २९५०.<br>**दक्षिणेस** - सि.स.नं.२९९०.<br>**उत्तरेस** - सि.स.नं.२९९३पै) | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

८.६.२०२१

**(राजेंद्र निंबाळकर)** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :-** ११ /०६ /२०२१

D:\Pravin sir\ganeshnagar Bhosari\3 C\final 3 c renewed order.docx